# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.02.2025** **वार- गुरुवार**

---

**साखर उत्पादन**

यंदाचा ऊस गाळप हंगाम आता अखेरच्या टप्प्यात असून देशभरात आतापर्यंत 77, तर राज्यात 30 कारखान्यांचा गाळप हंगाम संपला आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत देशातील साखर उत्पादनात 27 लाख टन, तर राज्याच्या साखर उत्पादनात 11 लाख टनांनी घट झाली आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या अंदाजानुसार देशात 270 लाख टन उत्पादन अपेक्षित असून, गेल्या वर्षाच्या 319 लाख टनांच्या तुलनेत त्यात 49 लाख टन घट होऊ शकते. राज्यात गेल्यावर्षी 110 लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते. यंदा त्यात 24 लाख टनांनी घट होऊन ते 86 लाख टन होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. साखरेच्या किमान विक्री दरात तसंच साखर उद्योगातून तयार होणाऱ्या इथेनॉलच्या खरेदीदरात वाढ झालेली नाही. ती झाली तर कारखान्यांचं अर्थचक्र सुधारण्यास मदत होईल, असं राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी आज पुण्यात बोलताना सांगितलं.

**पिफ**

गेला आठवडाभर सुरू असलेल्या 23व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महत्त्वाचा आज समारोप होत आहे. "द रूम नेक्स्ट डोअर" या चित्रपटानं महोत्सवाची सांगता होईल. सांगता समारंभात प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट, प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक आणि संत तुकाराम सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट यासह अन्य विविध विभागात पारितोषिकं दिली जाणार आहेत.

**दहावी परीक्षा**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षेला उद्यापासून सुरुवात होत आहे. यंदा राज्यातल्या 5 हजार 130 मुख्य केंद्रावर परीक्षा होत असून 16 लाख 11 हजार 610 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी निर्धारित वेळेनंतर 10 मिनिटे वेळ वाढवून देण्यात येणार असल्याचं मंडळानं कळवलं आहे.

**संमेलन**

दिल्लीत उद्यापासून सुरू होत असलेल्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्तानं पुणे ते दिल्ली महादजी शिंदे विशेष रेल्वे काल पुण्याकडून दिल्लीकडे रवाना झाली. आज रात्री ही रेल्वे दिल्लीमध्ये पोहोचणार आहे. या प्रवासादरम्यान 'मराठी साहित्ययात्री संमेलन' आयोजित करण्यात आलं आहे. या अंतर्गत रेल्वेच्या प्रत्येक डब्यात कवि संमेलन, कथाकथन असे कार्यक्रम सुरू आहेत. सुमारे 1200 साहित्यिक, सोशल मीडिया समाज माध्यमातील प्रभावी व्यक्तिमत्व, युवक, लोककलाकार या संमेलनात उत्स्फूर्त प्रतिसाद घेत असून अत्यंत उत्साही वातावरणात हा प्रवास सुरू असल्याचं संमेलनाचे अध्यक्ष शरद तांदळे यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

**महोत्सव**

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयानं येत्या बुधवारी 26 फेब्रुवारी रोजी पुण्यात पंडित कुमार गंधर्व महोत्सवाचं आयोजन केलं आहे. कुमार गंधर्वांची गायकी याविषयावर पंडित कुमार गंधर्व यांचे ज्येष्ठ शिष्य पंडित सत्यशील

देशपांडे संवाद साधणार असून प्रात्यक्षिकासह सादरीकरण करणार आहेत. तसेच विदुषी सानिया पाटणकर यांचं गायनही होणार आहे.

**<u>जीबीएस</u>**

पुणे शहरात आणखी दोन रुग्णांचा गुलियन बॅरे सिन्ड्रोम या आजारानं मृत्यू झाला आहे. या आजारानं आता पर्यंत 11 जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात आतापर्यंत 211 जणांना जीबीएसचं निदान झालं आहे.

**<u>अंदाजपत्रक</u>**

पुणे महापालिकेचं आगामी आर्थिक वर्षाचं अंदाजपत्रक पारदर्शी असावं; त्यावर राज्यातील सत्ताधाऱ्यांचा प्रभाव दिसला तर उच्च न्यायालयात दाद मागू असा इशारा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिला आहे. मविआच्या शिष्टमंडळाने या मुद्द्यावर आज महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिलं.

**<u>पिंपरी-चिंचवड</u>**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत साप्ताहिक स्वच्छता मोहीम राबवत आहे. या अंतर्गत आकुर्डीच्या खंडेराया भाजी मंडईमध्ये तसंच सार्वजनिक ठिकाणे आणि मुख्य चौकांची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. भाजी मंडई आणि आजूबाजूच्या भागात प्लेगेथॉन घेण्यात आलं; यावेळी भाजी मंडईतील व्यापारी आणि गिऱ्हाईकांना स्वच्छतेचं महत्व पटवून देण्यात आलं.

**<u>प्रगटदिन</u>**

संत श्री गजानन महाराज यांच्या प्रगट दिनानिमित्त पुण्यातील संत गजानन महाराजांच्या विविध मंदिरात आज सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे. या निमित्तानं अनेक धार्मिक कार्यक्रमांचंही आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>पारितोषिक</u>**

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पुणे शाखेला 2024 मधील उल्लेखनीय कार्याबद्दल विभागीय स्तरावर सर्वोत्तम शाखा तसंच सर्वोत्तम विद्यार्थी शाखा अशी दोन पारितोषिकं मिळाली आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल 35 तर किमान 14 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**